नि.फौ.ख.क्र.८०/२०१०
शासन वि. शामदखा आशदखा +६
नि.क्र.८०
**CNR :NO:MHBU06-001056-2010**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१

मी शपथेवर खरे कथन करतो की,

नाव : राजेंद्र चंद्रशेखर जयस्वाल ,

वय : ४८ वर्ष,

व्यवसाय : टेन्ट हाऊस ,

राहणार : समन्वय नगर , तालुका- खामगाव ,
जिल्हा- बुलढाणा .

सरतपास:

सरतपास, सरकार तर्फे सरकारी वकील, कु. पिंकी नारायणदास पेशवानी यांच्यातर्फे सुरू:

मी फिर्यादीला ओळखतो कारण त्यांचे दुकान माझ्या दुकानाच्या शेजारी आहे. मी आरोपींना ओळखत नाही.आता मला सरकारी वकिलांनी घटनास्थळ पंचनामा दाखविला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर मला माहीत नाही. घटनास्थळ वरचे पंचाच्या सहीला निशाणी क्रमांक.८१ देण्यात येत आहे .

सरकारी वकिलांतर्फे सरतपास पूर्ण:

सरकारी वकिलांनी उलटतपासाची परवानगी मागितली, त्यानुसार सरकारी वकिलांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये उलटतपासाची परवानगी देण्यात येत आहे.

उलटतपास सरकारी वकिलांतर्फे:

२. हे म्हणणे बरोबर आहे की, फिर्यादीच्या दुकानामध्ये चोरी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३०.०१.२०१० रोजी

पोलिसांनी माझ्या समक्ष फिर्यादीच्या दुकानामध्ये घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या वेळेस माझ्या सोबत दुसरे पंच ही हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, तो पंचनामा मी वाचून व समजल्यानंतर त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष दिली .

<u>सरकारी वकिलांतर्फे उलटतपास पूर्णण.</u>

<u>उलटतपास आरोपी तर्फे श्री. ए .एस. शिरसागर वकिलांतर्फे:</u>

३. हे म्हणणे बरोबर आहे की, फिर्यादीच्या दुकान मध्ये कोणत्या तारखेला आणि कोणत्या वेळेस चोरी झाली होती याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा यावर सही मागितली होती म्हणून मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे बरोबर आहे की, मी घटनास्थळ पंचनामा वाचला नाही तसेच पोलिसांनी ही मला घटनास्थळ पंचनामा वाचून दाखविला नाही .

उलटतपास पूर्ण:

<u>फेरतपास नाही:</u> श्रवणोत्तर स्वीकृत

दि.१३/०८/२०२६ **sd/-**

(एफ.टी.शेख)
सह. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
खामगांव, जिल्हा- बुलढाणा.